लेखक मानवाधिकार चळवळ
**डॉ.धनंजय खैर** (होमिओपॅथी तज्ञ) यांचे
३० वर्षाचा अनुभव असलेले कराडमधील एकमेव
**होमिओपॅथी क्लिनीक**
ऑपरेशन शिवाय नाकातील वाढलेले हाड, मुतखडा, पिताशयातील खडा, दमा यासारख्या जुनाट आजारावरील उपचारासाठी भेटा.
टिळक हायस्कुल जवळ, कराड मोबा:९३७०३३२४१३

जनसामान्यांचा बुलंद आवाज
# कर्मयोगी
Karmayogi
▮ मोबा.9326133731 सातारा-सांगली-कोल्हापूर-सोलापूर

▮कराड (सातारा) वर्ष:२५ ▮अंक:२०८ RNI NO.MAH-MAR/2001/3806 / संपादिका:सौ.मंगल नंदकुमार लोखंडे / प्रबंध संपादक:श्री.संजय पवार ▮ शुक्रवार दि.३१ जानेवारी २०२५ ▮ पाने ४ ▮ किंमत २ रूपये
▮Karad(Satara) Vol-25 ▮ Ishue-208 RNI NO.MAH-MAR/2001/3806 / Editor Mrs.Mangal Nandkumar Lokhande / ▮ Friday 31 January 2025 ▮ Pages 4 ▮Price 2 Rs.

## मनोज जरांगेंचे उपोषण स्थगित

### मुंबईला धडक देण्याचा निर्वाणीचा इशारा



**जालना,दि.३०(वृत्तसंस्था)**
राज्यामध्ये मराठा आरक्षणाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आलेला आहे. मराठा नेते मनोज जरांगे पाटील हे आमरण उपोषणावर बसले आहे. २५जानेवारीपासून जरांगे पाटील हे अंतरवली सराटीमध्ये उपोषणावर बसले आहेत. मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी त्यांचे उपोषण स्थगित केले आहे.

जालनामधील त्यांचे अंतरवली सराटी गावामध्ये हे उपोषण सुरु होते. मनोज जरांगे पाटील यांनी सहा दिवसांच्या आमरण उपोषणानंतर स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. खासदार बजरंग सोनावणे यांनी समजावल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण सोडले आहे. संपूर्ण मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देत ओबीसी अंतर्गत आरक्षण देण्याची मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी मागील दीड वर्षापासून मराठा आरक्षणाचा मुद्दा आक्रमकपणे मांडला आहे. आमरण उपोषण, आंदोलन आणि महाराष्ट्र दौरा करुन जरांगे पाटील यांनी राज्यव्यापी आंदोलन उभे केले आहे. विधानसभा निवडणुकीमध्ये त्यांनी मराठा समाजाला विचारपूर्वक मतदान करण्याचे आवाहन केले होते. मात्र राज्यात पुन्हा एकदा महायुती सरकार एकतर्फी निकालाने सत्तेमध्ये आले. याचबरोबर जरांगे पाटील यांनी सडकून टीका केलेले देवेंद्र फडणवीस हे राज्याचे मुख्यमंत्री झाले आहेत. फडणवीस यांच्या सरकारच्या काळात आता पुन्हा एकदा मनोज जरांगे पाटील यांनी आमरण उपोषण सुरु केले आहे

## कायद्याच्या चौकटीत जे बसेल ते सर्व करू

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे आश्वासन



**नवी दिल्ली,दि.३०(वृत्तसंस्था)**
मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आठवडाभरापूर्वी पुन्हा एकदा मराठा आरक्षणासाठी उपोषण सुरू केले होते. मात्र आज त्यांनी भाजपा आमदार सुरेश धस यांच्या हातून ज्यूस घेत आपले उपोषण सोडले. उपोषण सोडण्यापूर्वी त्यांनी काही आपल्या मागण्या मांडल्या आहेत. त्या पूर्ण करण्यासाठी तीन महिन्यांचा वेळ दिला आहे. महत्त्वाचे म्हणजे मागण्या पूर्ण न झाल्यास मुंबईत येणार असल्याचा इशारा त्यांनी दिला आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न विचारला असता त्यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सध्या तीन दिवस दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी गेले आहेत. यावेळी माध्यमांशी संवाद साधताना देवेंद्र फडणवीस यांना मनोज जरांगेंच्या मागण्यासंदर्भात प्रश्न विचारण्यात आला. यावर ते म्हणाले की, मनोज जरांगे-पाटील यांनी उपोषण सोडल्याचा आनंद आहे. आम्ही मराठा समाजाच्या संदर्भात जे काही निर्णय घेतले आहेत, ते महायुतीच्या सरकारनेच घेतले आहेत. हे सगळे निर्माण झालेले प्रश्न कायद्याच्या चौकटीत सोडवणे ही आमची जबाबदारी आहे आणि आम्ही तो प्रयत्न करतो आहोत. त्यामुळे कायद्याच्या चौकटीतील ज्या-ज्या मागण्या ते (मनोज जरांगे) करतील किंवा कोणीही करेल त्या मागण्या आम्ही निश्चित मान्य करू. पण आमचे म्हणणे एवढेच आहे की, भारताचे संविधान आणि कायदा यांच्या चौकटीतील मागण्या असल्या पाहिजेत. त्या असल्या तर योग्य प्रतिसाद सरकारकडून मिळेल, असे सूचक वक्तव्य देवेंद्र फडणवीस यांनी केले.

**मनोज जरांगेंनी काय मागण्या केल्या?**

दरम्यान, मनोज जरांगे यांनी आज उपोषण सोडण्यापूर्वी नोंदी शोधणारी शिंदे समिती लगेच सुरू करण्याची मागणी केली. तसेच ते म्हणाले की, शिंदे समितीने काम करताना अधिकाऱ्यांनी किचकट अटी घालू नये. वंशवाळ समिती स्थापन करावी. मोडलिपी अभ्यासक नसल्याने नोंदी शोधत येत नाही. आमच्याकडे असलेल्या अभ्यासकांना नोंदी शोधण्यासाठी संधी द्या. सातारा संस्थान, हैदराबाद गॅझेट, बॉम्बे गॅझेट आणि औंध संस्थान पुरावे घेण्यात यावे. राज्यातील मुलांवर झालेल्या गुन्हे सरसकट मागे घेण्यात यावे. एसईबीसी १० टक्के आरक्षण आम्हाला नको होते. कारण आता १० आरक्षण दिले तरी सरकार १०० टक्के फीस घेत आहे. आरक्षणासाठी बलिदान देणाऱ्यांच्या वारसांना नोकरी देण्यात यावी. ओबीसीत आरक्षण द्यायचे असेल, तर २०१२ च्या कायद्यात दुरूस्ती करा.

पान नं.४ वर...

## गुन्हेगारी खपवून घेणार नाही: उपमुख्यमंत्री



**बीड,दि.३०(वृत्तसंस्था)**
बीड जिल्ह्यात कोणी कुठल्या गोष्टीसाठी जबाबदार असेल, जर कोणी वेडेवाकडे प्रकार करणार असेल किंवा कोणी विकासकामांच्या आड येत असेल तर मी ते खपवून घेणार नाही. वेळ पडल्यास अशा लोकांवर मकोका लावायला मागेपुढे पाहणार नाही. जिथे तथ्य असेल तिथे कारवाई केली जाईल, पण जिथे तथ्य नसेल त्यावेळी कारवाई केली जाणार नाही, अशा रोखठोक शब्दांत गुरुवारी बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी आपली भूमिका मांडली. अजित पवार गुरुवारी सकाळी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीसाठी बीडमध्ये दाखल झाले होते.

यानंतर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयात पक्षाच्या कार्यकर्त्यांना संबोधित करताना बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी खपवून घेतली जाणार नाही, असा इशारा दिला. अजित पवार हे कार्यकर्त्यांना संबोधित करत असताना धनंजय मुंडे हाताची घडी घालून त्यांच्या बाजूला उभे होते. यावेळी अजित पवार यांनी बीडमधील गुन्हेगारांना निर्वाणीचा इशारा दिला. यापुढे बीडमध्ये गुन्हेगारी प्रवृत्ती आणि कृत्यांना थारा दिला जाणार नाही, असा इशारा त्यांनी दिला. मी बीडचे पालकमंत्रीपद स्वीकारत असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सांगितले होते, याठिकाणी चांगले अधिकारी पाहिजेत.

मी आता बीडमधील अधिकाऱ्यांकडे बघणार आहे. काही अधिकारी बरीच वर्षे याठिकाणी आहेत. मी त्यामध्ये दुरुस्ती करणार आहे. मी काम करताना भेदभाव करत नाही.

पान नं.४ वर...

## तांबवेचे माजी सरपंच शंकरराव पाटील यांचे निधन

**कराड,दि.३०(प्रतिनिधी)**



तांबवे (ता.कराड) गावचे माजी सरपंच आणि प्रगतशील शेतकरी शंकरराव कृष्णा पाटील (वय ९५) यांचे बुधवारी वृद्धापकाळाने निधन झाले.

सरपंच पदाच्या काळात त्यांनी तांबवे गावच्या जडणघडणीत मोठे योगदान दिले होते. गावच्या धार्मिक कार्यक्रमात त्यांचा सक्रिय सहभाग होता. अखेरपर्यंत ते सांप्रदायिक क्षेत्रात कार्यरत होते. कराड जनता सहकारी बँकेचे वसुली अधिकारी प्रमोद पाटील यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुली, एक मुलगा, तीन पुतणे, सुना, नातवंडे, असा परिवार आहे. रक्षा विसर्जन विधी शुक्रवारी (दि.३१) सकाळी १० वाजता होणार आहे.

## महाकुंभमध्ये पुन्हा अग्नितांडव; १५ तंबू जळाले

**प्रयागराज,दि.३०(वृत्तसंस्था)**
प्रयागराजमध्ये महाकुंभ मेळा सुरू आहे. काही दिवसापूर्वी या मेळामध्ये मोठी आग लागल्याची घटना समोर आली होती. आता पुन्हा एकदा आग लागल्याची बातमी समोर आली आहे. चमनगंज झुंसीजवळील जुना आखाड्याच्या छावणीत लागलेल्या आगीत १५ तंबू जळून खाक झाले.

पोलीस आणि अग्निशमन दलाच्या पथकाने आग आटोक्यात आणली आहे. आगीचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, या आगीच्या घटनेत १५ तंबू जळून खाक झाले. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाला तात्काळ कळवण्यात आले. तेथे पोहोचण्यासाठी कोणताही मार्ग नसल्याने अग्निशमन दलाला तंबूपर्यंत पोहोचण्यास अडचण आली. असे असूनही, अग्निशमन दल वेळेवर पोहोचले आणि कोणतीही मोठी दुर्घटना न होता आग आटोक्यात आणली.

## कराड अर्बन बँकेला बेस्ट टर्नअराऊंड बँक पुरस्कार

### लोणावळा येथील 'बँको ब्लू रीबन २०२४' कार्यक्रमात गौरव



**कर्मयोगी वृत्तसेवा**
**कराड,दि.३०**
दि. कराड अर्बन बँकेला सहकार क्षेत्रातील सन्मानाचा 'बेस्ट टर्नअराऊंड बँक' पुरस्कार जाहीर झाला आहे. बँकोच्या वतीने सहकार क्षेत्रातील उत्तम कामगिरी तसेच सुपरवायझरी ॲक्शन फ्रेमवर्क या रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार ज्या बँकांनी बदलत्या नियमांचे पालन करीत आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा केली आहे. अशा बँकांना पुरस्कार दिला जातो. त्यानुसार यावर्षीचा पुरस्कार कराड अर्बन बँकेला जाहीर झाला आहे.

या पुरस्कारामुळे कराड अर्बन बँकेच्या १०८ वर्षांच्या वाटचालीत आणखीन एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. बँकोच्यावतीने ॲम्बे व्हॅली लोणावळा येथे 'बँको ब्लू रीबन २०२४' या कार्यक्रमात बँकेला सदरचा पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. बँकेच्यावतीने मुख्य कार्यकारी अधिकारी सीए. दिलीप गुरव, ट्रेझरी विभागाचे महाव्यवस्थापक सलीम शेख, कर्ज विभागाचे महाव्यवस्थापक गिरीश सिंहासने, हिशेब विभागाचे महाव्यवस्थापक सीए.धनंजय शिंगटे, उपमहाव्यवस्थापक अतुल शिंदे, सहाय्यक महाव्यवस्थापक संतोष गायकवाड व व्यवस्थापक संदीप पवार यांनी हा पुरस्कार स्विकारला.

या पुरस्काराबद्दल बँकेचे सभासद व ग्राहक यांनी बँकेचे ज्येष्ठ संचालक व माजी अध्यक्ष सुभाषराव जोशी, बँकेचे अध्यक्ष डॉ.सुभाष एरम, बँकेचे उपाध्यक्ष समीर जोशी, व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष डॉ.अनिल लाहोटी व मुख्य कार्यकारी अधिकारी सीए. दिलीप गुरव यांचे विविध माध्यमांद्वारे अभिनंदन केले.

## निसरे फाटा ते मायणी रस्त्याकडेची झाडे तोडण्यास परवानगी देऊ नये

### प्रहार जनशक्ती पक्षाची मागणी:उपवनसंरक्षकांना निवेदन सादर



**कर्मयोगी वृत्तसेवा**
**कराड,दि.३०**
शासनाच्या माध्यमातून पंढरपूर राज्य मार्गावरील निसरे - उंब्रज - मसूर - मायणी ते सातारा जिल्हा हद्दीपर्यंत रस्ता सुधारण्याच्या कामाला मंजूरी देण्यात आली आहे. यात शेकडो झाडांची कत्तल करण्यात येणार आहे. तरी वनविभाग व प्रशासनाने कुठल्याही परिस्थितीत या रस्त्याच्या कडेची झाडे तोडण्यास परवानगी देऊ नये. अशी मागणी प्रहार जनशक्ती पक्षाच्यावतीने करण्यात आली आहे. याबाबतचे निवेदन पक्षाचे जिल्हाध्यक्ष मनोज माळी यांनी सातारा वनविभागाच्या उपवनसंरक्षक आदिती भारद्वाज यांना दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, आत्तापर्यंत कराड व पाटण तालुक्यातील अनेक राष्ट्रीय, राज्य व जिल्हा मार्गांचे रुंदीकरण व मजबूतीकरणाची कामे करण्यात आली. या रस्त्यांची कामे करताना हजारो झाडांची कत्तल केली गेली. यामुळे दोन्ही तालुक्यांतील सुधारणा केलेले रस्ते अक्षरशा झाडांवीना बोडके पडले आहेत.

रस्त्याचे काम झाल्यावर संबंधित ठेकेदाराने रस्त्याच्या कडेला पुन्हा झाडे लावण्याचा नियम आहे. तसे लेखीही घेतले जाते मात्र प्रत्यक्षात हे नियम केवळ कागदावरच रहात आहेत. आतापर्यंत कराड-पाटण, कराड-ओगलेवाडी-सुर्ली घाट-कडेगाव, कराड-तासगाव आदी अनेकरस्त्यांची कामे पूर्ण करण्यात आली. संबंधित ठेकेदार पैसे घेऊन पसार झाले. मात्र एकही झाड त्यांनी लावले नाही. यावर वन विभाग, महामार्ग प्रशासन अथवा शासनाने त्या ठेकेदारांवर कोणतीही कारवाई केली नाही.

त्यामुळे कराड व पाटण तालुक्यातील रस्त्याच्या कामासाठी तोडलेली झाडे त्या ठेकेदाराकडून पुन्हा लावून घ्यावीत, त्या झाडांचे संगोपन करावे. त्यानंतरच अन्य रस्त्यांच्या कामासाठी झाडे तोडण्याची परवानगी द्यावी. सद्या निसरे - उंब्रज - मसूर -मायणी ते सातारा जिल्हा हद्दी पर्यंतच्या रस्त्याच्या कामासाठी झाडे तोडण्याची मागणी

पान नं.४ वर...

### हवामानाचा अंदाज

| ठिकाण | किमान | कमाल |
|---|---|---|
| सातारा | २१ | २० |
| सांगली | २२ | २१ |
| कोल्हापूर | २३ | २२ |
| पंढरपूर | २२ | २१ |
| सोलापूर | २२ | २१ |

### चिमटा.ऽ..ऽ...ऽ




व्यंगचित्र हे एकांतात आनंद देणारे माध्यम आहे तो काही परफॉर्मिक प्रकार नाही...

जा.नं.नपा/कावि/जलनि:- ६३९
दिनांक:- ३० जानेवारी २०२५

## कराड नगरपरिषद,कराड

### जलनि:सारण विभाग

### जाहिर निविदा सुचना क्र.२३५-सन २०२४-२०२५

महाराष्ट्र शासनाने त्या-त्या वर्गवारीनुसार नोंदणीकृत कंत्राटदाराकडून कराड नगरपरिषदेचे ड्रेनेज विभागाकडील खालील नमूद कामांचे निविदा मागवित आहे.

| अ.नं. | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम लक्ष | टेंडर बयाणा रक्कम लक्ष | टेंडर फॉर्म किंमत र.रू. | कामाची मुदत | कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कराड नगरपरिषदेच्या अग्निशमन केंद्र मिळकतीवर नाव टाकणे, नावाच्या पाटया तयार करणे, खिडक्यांना जाळया बसविणे, इत्यादी आवश्यक सर्व कामे करणेबाबत. | ४,४६,९५१/- | ४५००/- | ५००/- + GST/CGST १८%=५९०/- | ३० दिवस | नोंदणीकृत ठेकेदार किंवा नगरपरिषदेचा प्लंबिगधारक |
| २ | कराड नगरपरिषदेच्या अग्निशमन केंद्राच्या गेटचे रूंदीकरण व नवीन करणे आणि अग्निशमन केंद्राचे नाव व गेटला कलर करून मिळणेबाबत. | ४,७४,६२४/- | ४७५०/- | ५००/- + GST/CGST १८%=५९०/- | ३० दिवस | नोंदणीकृत ठेकेदार किंवा नगरपरिषदेचा प्लंबिगधारक |

वरील कामासंबधी अटी, शर्ती व तांत्रिक क्षमता पात्रतेबाबत माहिती नगरपरिषदेच्या जलनि:सारण विभागात मिळेल. निविदा फॉर्मस दि.३१/०१/२०२५ ते दि. १३/०२/२०२५ अखेर सायंकाळी ५ वाजेपर्यंत सुट्टीचा दिवस वगळून नगरपरिषदेच्या एक खिडकी योजना येथे रोख रक्कम भरून मिळतील. निविदा फॉर्मस दि. १४/०२/२०२५ अखेर सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत मुख्याधिकारी, कराड नगरपरिषद, कराड यांचे नावे समक्ष सादर करावयाचे आहेत. सदर कामासाठी दुहेरी लिफाफा पध्दतीचा अवलंब करण्यात येत आहे. कोणतीही निविदा मंजुर करण्याचा अथवा आलेल्या सर्व निविदा नामंजूर करण्याचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.

शिक्का

सही/-
श्री. शंकर खंदारे
प्रशासक तथा मुख्याधिकारी गट-अ (निवडश्रेणी)
कराड नगरपरिषद, कराड.

## सुविचार

वाईट विचारांचे गवत नेहमी आपोआप उगवते...
चांगल्या गोष्टी नेहमी पेराव्याच लागतात...

## संपादकीय

# असरने धरलेला आरसा

देशातील शालेय शिक्षणाची गुणवत्ता किती खालावली आहे, याची जाहीर चर्चा होण्याचे वार्षिक निमित्त म्हणजे 'असर'चा अहवाल. देशभरातील सुमारे सहाशे जिल्ह्यांतील सुमारे सहा लाख विद्यार्थ्यांची वाचन आणि गणित यांच्या मूलभूत क्षमतांची पाहणी करून प्रसिद्ध होणारा हा अहवाल दर वर्षी आपल्या शिक्षण व्यवस्थेसमोर आरसा धरतो. गेल्या अनेक वर्षांपासून नित्यनेमाने होत असलेल्या या उपक्रमातून शालेय शिक्षणाबाबत समोर येणाऱ्या वास्तवातून धडा घेण्याचे आणि गुणवत्ता उंचावण्यासाठीच्या प्रयत्नांचे महत्त्व अधोरेखित होते. तिसरीच्या विद्यार्थ्यांना दुसरीचे पुस्तक वाचता येणे आणि वजाबाकीचे गणित सोडविता येणे याबाबत गेल्या काही वर्षांच्या तुलनेत यंदा सुधारणा झाल्याचे सकारात्मक चित्र यंदाचा अहवाल रेखाटतो. २०१८मध्ये वीस टक्क्यांच्या घरात असणारे याबाबतचे प्रमाण अनुक्रमे २७ आणि ३० टक्क्यांच्या घरात पोहोचले आहे. ही वाढ कौतुकास्पद असली, तरी तिसरीच्या मुलांना दुसरीचे पुस्तक व्यवस्थित वाचता न येण्याचे आणि वजाबाकीचे गणित सोडविता न येण्याचे प्रमाण अधिक म्हणजे ७० टक्के आहे, हे दुर्लक्षून चालणार नाही. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात वाचन आणि अंकगणित यांच्या सार्वत्रिकीकरणावर भर दिल्याने यंदा याबाबतचे प्रमाण वाढल्याकडे अंगुलिनिर्देश केला जात आहे; परंतु हा भर आणखी वाढविण्याची आणि यासाठी अधिक जोरकसपणे काम करण्याची गरजही यातून स्पष्ट होते. मुलांमध्ये वाचन आणि गणन करण्यासाठीची कौशल्ये विकसित करण्यासाठी शिक्षकांना अधिक प्रशिक्षण देण्यापासून त्यांच्यावरील शिक्षणेतर कामाचा बोजा कमी करण्यापर्यंतची पावले उचलण्याची आवश्यकताही यातून दिसते. हा मुद्दा सातत्याने मांडला जात आहे; परंतु त्याकडे तितक्याच सातत्याने दुर्लक्ष होत आले आहे. कधी काळी शिक्षणात अग्रेसर असल्याचा अभिमान महाराष्ट्र नेहमीच बाळगत आला आहे. वास्तविक, गेल्या दोन-तीन दशकांत शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षणाबाबत तमिळनाडू, कर्नाटक यांसारखी राज्ये महाराष्ट्राच्या पुढे गेली आहेत. 'असर'च्या ताज्या अहवालातील महाराष्ट्राबाबतचे चित्र याहून फार वेगळे नाही. दोन अंकी संख्यांची वजाबाकी करण्यात राज्याच्या ग्रामीण भागातील तिसरीची मुले कमी पडत असल्याचे या अहवालाने नमूद केले आहे आणि या मुलांचे प्रमाण ७० टक्के आहे. सरकारी शाळा कमी गुणवत्तेच्या आणि खासगी शाळा अधिक गुणवत्तेच्या असे सरधोपट समीकरण आपल्याकडे आहे. ते खरे नसल्याचे या अहवालातून स्पष्ट होते. ग्रामीण भागातील शिक्षणावर लक्ष केंद्रित करण्याची गरज यातून दिसते. करोनाच्या काळात विविध कारणांमुळे सरकारी शाळांमधील पटनोंदणी वाढली होती; मात्र, आता ती कमी होत असल्याचे दिसते. २०२२मध्ये सरकारी शाळांमधील पटनोंदणी ७२.९ टक्के होती; ती आता ६६.८ टक्क्यांवर आली आहे. सर्व प्रकारच्या शाळांमधील एकूण नोंदणी ९८ टक्क्यांवर गेली असली, तरी सरकारी शाळांमधील नोंदणी कमी झाली आहे. सुविधांची कमतरता, आपले हक्काचे कर्मचारी म्हणून सरकारकडून त्यांचा होणारा वापर आणि काही प्रमाणात शिक्षकांमधील उदासीनता यांमुळे सरकारी शाळांची प्रतिमा उंचावताना दिसत नाही. याचा परिणाम तेथील पटनोंदणीवर होतो आहे. याबाबत पूरक कृती करण्याची गरज आहे. 'असर'चा अहवाल आला, की त्यातील निरीक्षणांवर चर्चा करायची आणि नंतर विसरून जायचे, असा प्रघातच पडला आहे. शिक्षणाची नेमकी स्थिती दर्शविणाऱ्या या अहवालाकडे गांभीर्याने पाहण्याची आणि उपचारात्मक कृती करण्याची गरज आहे. हा अहवाल आल्यानंतर केवळ चर्चा न करता, पुढील वर्षासाठीचे उद्दिष्ट निश्चित करून कार्यक्रम आखण्याची आवश्यकता आहे. मात्र, निव्वळ रेट्याने उद्दिष्टपूर्ती करून चालणार नाही. पायाभूत सुविधा, साधने, विद्यार्थी आणि शिक्षक यांचे प्रमाण, शिक्षकांचे प्रशिक्षण यांबाबत सुधारणा व्हायला हवी. त्यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करून द्यायला हवा. जाणकार तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेऊन त्यानुसार उद्दिष्टपूर्तीचा आराखडाही तयार करायला हवा. शिक्षणावरील खर्च फारसा न वाढविता, लोकसहभागाच्या नावाखाली सार्वजनिक निधी मिळविण्याचा आग्रह धरून आणि शिक्षकांना शिक्षकेतर कामांना जुंपून गुणवत्ता उंचावणार नाही. नवीन शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीचा फायदा होत असला, तरी शिक्षण हक्क कायद्याच्या चौकटीतच गुणवत्ता उंचावण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. यांपैकी काहीही न केल्यास 'असर'ला कर्मकांडाचेच स्वरूप येईल आणि पुढील वर्षी थोड्या फार फरकाने हीच चर्चा होईल.

'कर्मयोगी' हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक नंदकुमार ज्ञानेश्वर लोखंडे** यांनी हर्षद प्रिंटर्स अॅन्ड पब्लिशर्स, बनवडी पो.पार्ले, ता.कराड, जि.सातारा येथे छापून दैनिक कर्मयोगी कार्यालय ११६, श्रध्दा कॉम्प्लेक्स, स्टेशन रोड, बुधवार पेठ, कराड ४१५११० जि.सातारा (महाराष्ट्र) येथून प्रसिध्द केले. **संपादिका सौ.मंगल नंदकुमार लोखंडे** ***कार्यकारी संपादक - खंडू इंगळे** *पीआरबी अॅक्ट १८६७ नुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील. **RNI NO-MAHMAR/2001/3806**

**Karmayogi,** Printer, Publisher and Owner **Nandkumar Dnyaneshwar Lokhande** Printed at Harshad Printers And Publishers, Banawadi Post-Parle Tal-Karad Dist-Satara (MS) And Published at Daily Karmayogi Karyalay, 116, Shrdha Complex, Station Road, Budhawar Peth, Karad 415 110 Dist-Satara (MS) Editor **Mrs.Mangal Nandkumar Lokhande** *Exceutive Editor **Khandu Ingale** *PRB Act 1867 Editorial Responsibility **RNI NO-MAHMAR/2001/3806**

**Email - karmyogi2008@gmail.com**

**मुख्य कार्यालयः** ११६, श्रध्दा कॉम्प्लेक्स, स्टेशन रोड, बुधवार पेठ, कराड. ४१५११० (मोबा.९३२६१३३७३१) सातारा प्रतिनिधी :८४२१८२२५०० सोलापूर कार्यालयः(मोबा.९३७१८०७१४५) कोल्हापूर शहर कार्यालय-संपर्क (मोबा.९२२५८१२४२४). पंढरपूर शहर कार्यालय-संपर्क (मोबा.९०२८३४६४१५).

मलकापूर नगरपरिषद, जि.सातारा
जा.क्र./सा.प्र./जा.सु./१५१२/२०२५
दि.३०/०१/२०२५

# मलकापूर नगरपरिषद मलकापूर

### जिल्हा-सातारा

### महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५

**कलम -३ अन्वये नगरपालिका (क) वर्ग ने जाहीर करावयाचा लोकसेवेचा तपशील**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. एमसीओ -२०१५ /प्र.क्र. १८९/नवि -१४ दिनांक २३-०६-२०१५
महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. एमसीओ -२०१५ /प्र.क्र. ३९८/नवि -२० दिनांक ०४-०९-२०१७
महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. एमसीओ -२०१५ /प्र.क्र. ३९८/नवि -२० दिनांक २६-०८-२०१९
महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. एमसीओ -२०१९ /प्र.क्र.१८०/नवि -२० दिनांक २९-०१-२०२१
महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. एमसीओ -०९२२ /प्र.क्र. ३२/नवि -३२ दिनांक ३०-०९-२०२२
महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. एमसीओ -०९२२ /प्र.क्र. ३२/नवि -३२ दिनांक १५-१२-२०२२
महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. एमसीओ -०९२२/प्र.क्र. ३२/नवि -३२ दिनांक ०९-०१-२०२४

**कलम-३ अन्वये मलकापूर नगरपरिषदेने जाहीर करावयाचा लोकसेवांचा तपशील**

| अ.क्र. | अधिसूचित सेवेचे नाव | आवश्यक कागदपत्रे | फी | अधिसूचित सेवेची नियत कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जन्म प्रमाणपत्र देणे/ To issue birth certificate | विहित नमुन्यातील अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ अन्वये प्राधिकृत अधिकारी (सबंधित विभाग प्रमुख) | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| २ | मृत्युप्रमाणपत्र देणे/ To issue death certificate | विहित नमुन्यातील अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ अन्वये प्राधिकृत अधिकारी (सबंधित विभाग प्रमुख) | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ३ | विवाह नोंदणी प्रमाणपत्र देणे/ To issue marriage certificate | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. वास्तव्याचा पुरावा<br>३. वयाचा पुरावा<br>४. विवाहासाठी उपस्थित साक्षीदारांचे स्वयंघोषणापत्र<br>५. ९० दिवसांनंतर नोंदणी असल्यास स्वयंघोषणापत्र | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | विवाहनोंदणी अधिनियम, १९९८ अन्वये प्राधिकृत अधिकारी (सबंधित विभाग प्रमुख) | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ४ | मालमत्ता कर उतारा देणे/ To issue extract of property tax | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ५ | थकबाकी नसल्याचा दाखला देणे/ To issue no dues certificate | विहितनमुन्यातील अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ६ | अ) दस्तऐवजाच्या आधारे मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला<br>३. दस्तऐवजाची प्रत<br>(खरेदीखत/वक्षीस पत्र/वाटणीपत्र व इतर) | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| | ब) वारसा हक्काने मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे To issue certificate of transfer of property | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला<br>३. वारस हक्क प्रमाणपत्र | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ७ | झोन दाखला देणे/ To issue zone certificate | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. ७/१२ उतारा/सिटी सर्व्हे उतारा<br>३. मोजणी नकाशा/सिटी सर्व्हे नकाशा | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | रचना सहायक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ८ | भाग नकाशा देणे/ To issue part map | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. ७/१२ उतारा/सिटी सर्व्हे उतारा<br>३. मोजणी नकाशा/सिटी सर्व्हे नकाशा | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | रचना सहायक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ९ | बांधकाम परवाना देणे/ To issue building permission | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२. वास्तुविशारदाचा दाखला.<br>३. मालकी हक्काची कागदपत्रे<br>४. बांधकाम आराखडा नकाशा ५ प्रती.<br>५. मोजणी नकाशा<br>६. मंजूर रेखांकनाची प्रत | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ६० दिवस | रचना सहायक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १० | जोते प्रमाणपत्र देणे/To issue plinth completion certificate | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२. बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | रचना सहायक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ११ | भोगवटा प्रमाणपत्र देणे/ To issue occupancy certificate | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२. बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र<br>३. जोते प्रमाणपत्र ४. घर मालक/वास्तुविशारद यांचे पूर्णत्वाचे स्वयंघोषणापत्र | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | रचना सहायक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १२ | नळ जोडणी देणे/ To issue new water connection | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२. जागा मालकी कागदपत्रे<br>३. थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | पाणी पुरवठा, जलनिस्सारण व स्वच्छता अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १३ | जलनिसारण जोडणी देणे/ To issue drainage/sewer connection | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२. जागा मालकी कागदपत्रे.<br>३. थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपरिषदस्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | पाणी पुरवठा, जलनिस्सारण व स्वच्छता अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १४ | नव्याने कर आकारणी/ New Tax Assessment | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२. भोगवटा प्रमाणपत्र | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १५ | पुनःकर आकारणी/ Re-assessment of tax | विहितनमुन्यातील अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १६ | कराची मागणीपत्र तयार करणे/ To prepare tax demand notice | विहितनमुन्यातील अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १७ | मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे/ इतर मार्गाने | विहित नमुन्यातील अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १८ | करमाफी मिळणे/ To get Tax Exemption | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १९ | रहिवास नसलेल्या मालमत्तांना करात सुट मिळणे/ To get exemption from tax to the unoccupied properties | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| २० | स्वयं मुल्यांकन/ Self valuation | विहित नमुन्यातील अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| २१ | आक्षेप नोंदविणे/ To record objections | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |

| अ.क्र. | अधिसूचित सेवेचे नाव | आवश्यक कागदपत्रे | फी | अधिसूचित सेवेची नियत कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २२ | उपविभागामध्ये मालमत्ता विभाजन/ Division of property in sub division | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला<br>३. मालकी हक्काची कागदपत्रे (खरेदीखत, वाटणीपत्र, बक्षीसपत्र इ.) | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| २३ | मालमत्ता पाडणे व पुन:बांधणी कर आकारणी/ Tax assessment on demolishing and reconstruction of the property | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| २४ | नवीन नळ जोडणी | विहित नमुन्यातील अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | पाणी पुरवठा अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| २५ | मालकी हक्कात बदल करणे/ To change ownership rights | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२. मालकी हक्क कागदपत्रे<br>३. थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | पाणी पुरवठा, जलनिस्सारण व स्वच्छता अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| २६ | नळ जोडणी आकारामध्ये बदल करणे/To change size of water connection | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | पाणी पुरवठा, जलनिस्सारण व स्वच्छता अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| २७ | तात्पुरते/कायमस्वरुपी नळजोडणी खंडीत करणे/ To disconnect temporary/ permanent water connection | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | पाणी पुरवठा, जलनिस्सारण व स्वच्छता अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| २८ | पुन जोडणी करणे/ Reconnect the connection | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | पाणी पुरवठा, जलनिस्सारण व स्वच्छता अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| २९ | वापरामधे बदल करणे/ Change in use | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | पाणी पुरवठा, जलनिस्सारण व स्वच्छता अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ३० | पाणी देयक तयार करणे/ To prepare water bill | विहितनमुन्यातील अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | पाणी पुरवठा, जलनिस्सारण व स्वच्छता अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ३१ | प्लंबर परवाना/ Plumber License | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | पाणी पुरवठा, जलनिस्सारण व स्वच्छता अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ३२ | प्लंबर परवाना नुतणीकरण करणे/ Renewal of Plumber License | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शैक्षणिक अर्हतेबाबतचे प्रमाणपत्र<br>३. थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | पाणी पुरवठा, जलनिस्सारण व स्वच्छता अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ३३ | थकबाकी नसल्याचा दाखला No dues certificate | विहितनमुन्यातील अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | पाणी पुरवठा, जलनिस्सारण व स्वच्छता अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ३४ | नादुरुस्त मीटर तक्रार करणे/ To complain about faulty meter | विहितनमुन्यातील अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | पाणी पुरवठा, जलनिस्सारण व स्वच्छता अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ३५ | अनधिकृत नळ जोडणी तक्रार करणे/Unauthorized Water Connection | विहितनमुन्यातील अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | पाणी पुरवठा, जलनिस्सारण व स्वच्छता अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ३६ | पाण्याची दबाव क्षमता तक्रार/ Complaint about water pressure | विहितनमुन्यातील अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | पाणी पुरवठा, जलनिस्सारण व स्वच्छता अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ३७ | पाण्याची गुणवत्ता तक्रार/ Complaint about quality of water | विहितनमुन्यातील अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | पाणी पुरवठा, जलनिस्सारण व स्वच्छता अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ३८ | व्यापार/व्यवसाय/साठा करणेसाठी नाहरकत प्रमाणपत्र मिळणे/Trade NOC | योग्यप्रकारे भरलेले अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | सबंधित विभाग प्रमुख | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ३९ | मंडपासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे/Mandap NOC | १.योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. रस्ता पुनर्स्थापन करार | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | सबंधित विभाग प्रमुख | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ४० | नवीन परवाना मिळणे/ Getting New Licenses | १.ओळखपत्र (आयडी प्रुफ )<br>२. लीज डिड / लीगल ओक्युपंसी डॉक्युमेंट<br>३. कोणतीही थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | सबंधित विभाग प्रमुख | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ४१ | परवान्याचे नुतणीकरण/ Renewal of Licenses | १.योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकवाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | सबंधित विभाग प्रमुख | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ४२ | परवाना हस्तांतरण/ Transfer of Licenses | १.योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकवाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | सबंधित विभाग प्रमुख | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ४३ | परवाना दुय्यम प्रत/ Duplicate Copy of License | १.योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकवाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | सबंधित विभाग प्रमुख | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ४४ | व्यवसायाचे नाव बदलणे/ Change in name of business | १.योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकवाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | सबंधित विभाग प्रमुख | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ४५ | व्यवसाय बदलणे/ Change the business | १.योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकवाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | सबंधित विभाग प्रमुख | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ४६ | परवाना/भागीदाराचे नाव बदलणे/Change the business holder/Partner | १.योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | सबंधित विभाग प्रमुख | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ४७ | भागीदारांच्या संख्येत बदल(वाढ/कमी)/Change number of partners (increase/Decrease) | योग्यप्रकारे भरलेले अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | सबंधितविभाग प्रमुख | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ४८ | परवाना रद्द करणे/ Cancellation of Licenses | योग्यप्रकारे भरलेले अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | सबंधित विभाग प्रमुख | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ४९ | कालबाह्य परवानासाठी नुतणीकरण सुचना/ Notice for renewal of expired Licenses | १.योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | सबंधित विभाग प्रमुख | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |

# आदर्श मध्ये हुतात्मा दिनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना अभिवादन



**कर्मयोगी वृत्तसेवा**
**कराड,दि.३०**

भारतीय स्वातंत्र्यलढा अहिंसक मार्गाने व्हावा असा अट्टाहास धरणारे अहिंसेचे पुजारी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला विद्यालयाचे मुख्याध्यापक सचिन शिंदे, शिशुविहारच्या मुख्याध्यापिका लता नलवडे, सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ.प्राजक्ता पाटील, सौ.कोमल शिर्के यांच्या उपस्थितीत विद्यार्थी प्रतिनिधी विनायक शेलार, तनिष्का मोरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ.कोमल शिर्के यांनी केले.हुतात्मा दिनाचे महत्त्व विशद करून महात्मा गांधीजींनी जगाला दिलेली सत्य, अहिंसा, प्रेम, करुणा, आत्मबल ही पंचसूत्री आदर्शवत आहे असें मत व्यक्त केले.

शिशु विहारच्या मुख्याध्यापिका लता नलवडे यांनी महात्मा गांधीजींच्या जीवनातील प्रसंग सांगून विद्यार्थ्यांनी स्वावलंबन व वक्तशीरपणा अंगीकारावा असे मत व्यक्त केले.

सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ.प्राजक्ता पाटील यांनी जगाला शांततेचा संदेश देणाऱ्या महात्मा गांधीजींच्या जीवन चरित्राची माहिती देताना अहिंसा एक असे शस्त्र आहे की या शस्त्राच्या साह्याने मोठ-मोठी युद्ध ही बंदुकी शिवाय जिंकता येतात. हा विचार व्यक्त केला.तदनंतर समूहगीत गायन करून विद्यार्थ्यांनी महात्मा गांधीजींना आदरांजली वाहिली. सौ.प्रतीक्षा पवार यांनी आभार मानले.

# कृषी यांत्रिकीकरण योजनेच्या सोडत पध्दतीवर अभिप्राय नोंदविण्याचे शेतकऱ्यांना आवाहन

**सातारा,दि.३०(प्रतिनिधी)**

कृषी यांत्रिकीकरणात सध्याच्या सोडत पध्दत (लॉटरी) किंवा प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या पध्दतीचा अवलंब करण्यासाठी शेतकऱ्यांकडून अभिप्राय मागविण्याचा निर्णय कृषी विभागाने घेतला आहे तरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी अभिप्राय नोंदवावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भाग्यश्री फरांदे यांनी केले आहे.

राज्यात कृषी यांत्रिकीकरण योजनेत शेतकऱ्यांना सोडत पद्धतीत महाडीबीटीमहाआयटी या संकेतस्थळावर कधीही अर्ज करता येतो. आलेल्या अर्जांमधून निघणाऱ्या लॉटरीमधून लाभार्थी शेतकऱ्यांची निवड केली जाते. कृषी यांत्रिकीकरणात सध्याची सोडत पद्धत योग्य आहे का यावर होय किंवा नाही असे योग्य ते उत्तर देणे अपेक्षित आहे. तसेच या व्यतिरिक्त सोडत पध्दत ही 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' यापैकी कोणती सोडत पद्धत प्राधान्यांनी राबवावी याबाबतचा अभिप्राय घेतला जाणार आहे.

# सौर उर्जा प्रकल्पास जमीन न देण्यावर ग्रामस्थ ठाम

## गोरेगाव वांगी ग्रामस्थांचे आमरण उपोषणास सुरु



**कर्मयोगी वृत्तसेवा**
**पुसेसावळी,दि.३०**

गोरेगाव(वांगी) ता.खटाव येथे मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजनेला गायरानमधील जमीन देण्याबाबत ग्रामस्थांनी विरोध केला असुन शासनाच्या निर्णयाविरोधात ग्रामस्थांनी आमरण उपोषणास प्रारंभ केला आहे. त्याअनुषंगाने आज ग्रामस्थांची कार्यकारी अभियंता महावितरण प्रमोद रागीट,भिमराव मस्के,अतिरिक्त कार्यकारी अभियंता सुनिल काळोलीकर, उपकार्यकारी अभियंता अजय बोधे,शाखा अभियंता युवराज धर्मे, मंडलाधिकारी प्रविण घोरपडे, तलाठी तानाजी काटकर या अधिकाऱ्यांनी भेट घेतली पण ग्रामस्थ आपल्या मतावर ठाम राहिले. त्यांनी जमीन देण्याला कडाडून विरोध दर्शवला असुन शासनाने जनभावनेचा आदर करून प्रकल्पाला जमीन देण्याचा निर्णय रद्द करावा,जो पर्यत निर्णय रद्द होत नाही तोपर्यंत आमरण उपोषण न सोडण्याचा निर्धार ग्रामस्थांनी बैठकीत जाहीर केला.

याबाबत अधिकची माहिती अशी गोरेगाव (वांगी) ता.खटाव येथील गट नं.१७३ मधे मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनीचे काम करण्याबाबत सर्वे झाला असुन त्या प्रकल्पास ग्रामस्थांनी विरोध केला आहे कारण सदर गट नं १७३ मधील गायरान जमिनी व्यतीरिक्त गावास कोणतेही सार्वजनिक जमीन नसुन सदर जागेत मागील चाळीस वर्षांपासुन वृक्षारोपण केले असुन जलसंवर्धनाचा विचार करुन मनरेगा योजनेतुन पाच बंधारे बांधले गेले आहेत,मोठया प्रमाणात या क्षेत्रावर वृक्षारोपण केले आहे,गावात भूमीहीन अल्पभुधारकांची संख्या जास्त असल्यामुळे या क्षेत्रातच जनावरे चारली जातात,तसेच या परिसरात तीन मंदिरे व शेतात जाण्यासाठी तीन रस्तेही आहेत तरी सदर क्षेत्रात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनीचे काम करु नये व मंजूर असलेला सौर उर्जा प्रकल्प तात्काळ रद्द करावा किंवा इतर ठिकाणी स्थलांतर करण्याची मागणी ग्रामस्थांनी वारंवार शासकीय अधिकारी यांना भेटुन केली होती परंतु मागणीची प्रशासकीय पातळीवर कोणतीच दखल न घेतल्यामुळे ग्रामस्थांनी उत्तम मुगुटराव शिंदे यांच्या नेतृत्वाखाली चंद्रकांत दिनकर सावंत, वसंत अंतू कदम,भगवत शिदोबा कदम,संतोष विठ्ठल कदम यांनी आमरण उपोषणास प्रारंभ केला असुन सदर उपोषणास संपुर्ण गोरेगाव(वांगी) ग्रामस्थांनी पाठिंबा दिला आहे.उपोषणस्थळी विक्रमशिल कदम, हिम्मत माने, रविंद्र कदम, नवनाथ जाधव,राजकुमार शिंदे, दत्तात्रय कदम, आनंदराव कदम, नंदकुमार चव्हाण, सौरभ चव्हाण, पोलीस पाटील विपुल माळी आनंदा शिंदे,राहुल शिंदे,अमित जाधव यांसह सपोनि अविनाश मते यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनिरीक्षक अनिल शिरोळे, पो.हवालदार राहुल सरतापे, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिसूचित सेवेचे नाव | आवश्यक कागदपत्रे | फी | अधिसूचित सेवेची नियत कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५० | जाहिरात परवाना / आकाशचिन्ह परवाना, नवीन परवाना व नूतनीकरण/ Advertisement / Sky Signange License,New License and Renewal | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | सबंधित विभाग प्रमुख | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ५१ | सिनेमा चित्रिकरण परवाना, नवीन परवाना व नुतनीकरण / Movie shooting License, New license and renewal | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | सबंधित विभाग प्रमुख | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ५२ | व्यवसायपरवाना स्वयंनुतनीकरण/ Auto-renewal of Trade License | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | सबंधित विभाग प्रमुख | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ५३ | मोबाईल टॉवर परवाना/ Mobile Tower Permission | १.विहित नमुन्यातील अर्ज २.माहिती तंत्रज्ञान विभाग यांनी दिलेला परवाना ३. संबंधित इमारतीच्या मालकीहक्काचा पुरावा ४.वैध भाडेकरारनामा ५.स्थळाचा नकाशा (१:१०००) ६. ज्या इमारतीवर टॉवर उभारायचा आहे त्याचे वैध भोगवटा प्रमाणपत्र ७. संबंधित इमारतीच्या/जमिनीच्या मालकाचे ना-हरकत प्रमाणपत्र ८. सक्षम प्राधिकाऱ्याचा अग्निशमन ना-हरकत दाखला ९.सक्षम प्राधिकाऱ्याचे संरचनात्मक स्थिरता प्रमाणपत्र १०.पर्यावरण विभागाची ना-हरकत ११. संबधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना-देय प्रमाणपत्र १२.शासन वेळोवेळी निश्चित करेल असे इतर आवश्यक परवाने/ दस्तऐवज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ६० दिवस | नगररचना सहायक | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ५४ | रस्ता खुदाई परवानगी देणे, नवीन परवाना व नुतनीकरण / To grant road cutting permission | १.विहित नमुन्यातील अर्ज २. थकबाकी नसल्याचा दाखला ३.शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | नगर अभियंता (स्थापत्य) | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ५५ | राज्याच्या खाद्य परवाण्याकरिता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र देणे / To issue NOC from Municipality or other local bodies for State License for Food Business | १.विहित नमुन्यातील अर्ज २. थकबाकी नसल्याचा दाखला ३.ज्या इमारतीत सदर आस्थापना / कारखाना होणार आहे त्या इमारतीचे भोगवटाप्रमाणपत्र आणि सदरच्या मालकी हक्काबाबतची कागदपत्रे ४.शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | आरोग्य विभाग प्रमुख | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ५६ | खाद्य नोंदणी प्रमाणपत्राकरीता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे आरोग्य विषयक ना हरकतप्रमाणपत्र देणे / To issue Health NOC by Municipality / Panchayat for Food Registration Certificate | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२.थकबाकी नसल्याचा दाखला<br>३.ज्या इमारतीत सदर आस्थापना / कारखाना होणार आहे त्या इमारतीचे भोगवटाप्रमाणपत्र आणि सदरच्या मालकी हक्काबाबतची कागदपत्रे<br>४.शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | आरोग्य विभाग प्रमुख | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ५७ | पाणीउपसा करणेसाठी केंद्रीय भूजलसर्वेक्षण विभाग (अथवा ईतर संबंधित विभाग) यांचेना-हरकत प्रमाणपत्राकरिता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे पाणी अनुपलब्धताप्रमाणपत्र देणे / To Issue Certificate of non-availability of water from water supply agency required for NOC for water abstraction from Central Ground Water Authority/ Relevant Authority | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला<br>३. ना हरकत प्रमाणपत्र दिल्यानंतर भोगवटा प्रमाणपत्र घेणेबाबतचे व पर्जन्य जलपुनर्भरण करणे बाबतचे प्रतिज्ञापत्र<br>४. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | पाणी पुरवठा, जलनिस्सारण व स्वच्छता अभियंता | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ५८ | लॉजिंग हाऊस परवाना देणे./ Licensing of Lodging Houses. | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | मुख्याधिकारी | जिल्हा सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) | विभागीय सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) |
| ५९ | लॉजिंग हाऊस परवान्याचे नुतनीकरण करणे. /Renewal of Lodging House License. | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | मुख्याधिकारी | जिल्हा सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) | विभागीय सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) |
| ६० | मंगल कार्यालय / सभागृह वगैरे परवाना देणे. / Licensing of Office / Auditorium etc. | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | मुख्याधिकारी | जिल्हा सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) | विभागीय सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) |
| ६१ | मंगलकार्यालय / सभागृहवगैरेपरवान्याचे नुतनीकरणकरणे./Renewal of license of office / auditorium etc. | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | मुख्याधिकारी | जिल्हा सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) | विभागीय सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) |
| ६२ | फेरीवाले नोंदणी प्रमाणपत्र देणे. / Issuance of hawker registration certificate. | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | मुख्याधिकारी | जिल्हा सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) | विभागीय सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) |
| ६३ | भूमीगत दूरसंचार वाहिनी (ऑप्टीकल फायबर केबल) टाकण्याकरीता परवानगी देणे. (Permission for=establishment of under-ground S Cable Infrastructure (Optical Fibre Cable)) | १.विहित नमुन्यातील अर्ज २. नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२१/CR.२४२/ UD-२० दिनांक/१२/२०२२ मधील Schedule III नुसार आवश्यक कागदपत्रे ३. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ६० दिवस | मुख्याधिकारी | जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हास्तरीय दूरसंचार समिती | प्रधानसचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग व अध्यक्ष राज्यस्तरीय दूरसंचार समिती |
| ६४ | महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्ष संरक्षण आणि संवर्धन अधिनियम, १९७५ मधील कलम ८तरतुदींनुसार मधील वृक्षतोड परवानगी देणे. / Permitting felling of trees in accordance with the provisions of Section 8 of the Maharashtra (Urban Areas) Tree Protection and Conservation Act, १९७५. | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ४५ दिवस | सबंधित विभाग प्रमुख | नियोजन प्राधिकरणाचे मुख्याधिकारी | नियोजन प्राधिकरणाकडील वृक्ष प्राधिकरण |
| ६५ | रस्त्यांवरील खड्डे बुजविणे. / Filling potholes on roads. | पुराव्यासह अर्ज. उदा.<br>Geo-tag केलेले फोटो इत्यादी | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ५ दिवस | नगर अभियंता (स्थापत्य) | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ६६ | गटारावरील झाकणे सुस्थितीत ठेवणे./ Keeping drain covers in good condition. | पुराव्यासह अर्ज. उदा.<br>Geo-tag केलेले फोटो इत्यादी | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ५ दिवस | आरोग्य विभाग प्रमुख | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ६७ | शहरात स्वच्छता ठेवणे./ Keeping the city clean. | पुराव्यासह अर्ज. उदा.<br>Geo-tag केलेले फोटो इत्यादी | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १ दिवस | आरोग्य विभाग प्रमुख | कार्यालय अधिक्षक | मुख्याधिकारी |

(शिक्का)

सही/-
(प्रताप कोळी)
मुख्याधिकारी
मलकापूर नगरपरिषद, मलकापूर

पान नं.१ वरून...

## निसरे फाटा ते मायणी रस्त्याकडेची...

करण्यात येत आहे. तरी कुठल्याही परिस्थितीत या रस्त्याकडेची झाडे तोडण्यास परवानगी देऊ नये. अन्यथा प्रहार जनशक्ती पक्ष वन्यप्रेमींना सोबत घेऊन आपल्या कार्यालयाविरोधात तीव्र आंदोलन करेल. यावेळी कायदा व सुव्यवस्था बिघडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्यावर राहील. असा इशारा या निवेदनात देण्यात आला आहे. यावेळी शिवाजी चव्हाण, जिल्हा सचिव शुभम उबाळे, पाटण तालुकाध्यक्ष बंटीभाऊ मोरे,प्रितेश माने, प्रफुल खरात, मंगेश चव्हाण, अक्षय चव्हाण, अक्षय जाधव, एजाज काझी, सुमित मोरे इत्यादी उपस्थित होते.

## कायद्याच्या चौकटीत जे बसेल...

तसेच सगेसोयऱ्याची अंमलबाजावणी आम्हाला पाहिजे आहे. त्यासाठी आलेल्या ना हरकतीची छाननी सरकारला करायची आहे. दोन ते तीन महिन्यांत ही छाननी करू, असे आश्वासन देण्यात आले आहे. त्यामुळे याची कार्यवाही लवकर झाली नाही तर मुंबईची तारीख जाहीर करतो, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे.

## गुन्हेगारी खपवून घेणार नाही...

बीड कष्टकरी समाज मोठ्याप्रमाणावर राहतो. मी काम करताना जातीपाती नात्यागोत्याचा विचार केलेला नाही. बीड जिल्ह्यात जातीय सलोखा कायम राहिला पाहिजे. जिल्ह्यात चुकीच्या गोष्टी पूर्वापार चालत आल्या असतील तर त्याला आळा घातला पाहिजे. मी बीडमधील काही लोकांचे रिव्हॉल्व्हर हवेत उंचावून, कंबरेला लावून फिरतानाचे रील सोशल मीडियावर पाहिले आहेत. पुन्हा अशा गोष्टी दिसल्या तर खपवून घेतले जाणार नाही, संबंधितांचे लायसन्स रद्द केले जाील. मी सगळ्यांना सारखा नियम लावणार. बीड जिल्ह्यात बदल झाला पाहिजे, तो मला आणि नागरिकांना जाणवला पाहिजे, असे अजित पवार यांनी ठणकावून सांगितले. बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी हा गेल्या काही दिवसांपासून राज्यभरात चर्चेचा विषय झाला आहे. या पार्श्वभूमीवर अजित पवार यांनी पालकमंत्री म्हणून बीड जिल्ह्याची प्रतिमा बदलण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना कदापी संरक्षण दिले जाणार नाही, असे त्यांनी सांगितले. काहीजण मला इकडे आल्यावर भलामोठा हार, बुके किंवा पांडुरंगाची मूर्ती देतात. पण या लोकांना साधुसंतांचे विचारही लक्षात घेतले पाहिजेत. दादा आला तर आता काही काळजी नाही, असा विचार करत असाल तर तो मनातून काढून टाका. मी तुमच्या जवळचा असलो तरी चुकीचे वागू नका, असे अजित पवार यांनी खडसावून सांगितले.

**नव्याचे नऊ दिवस समजू नका**

मी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि कार्यकर्त्यांना सांगतो की, आपले चारित्र्य आणि प्रतिमा स्वच्छ ठेवा. चुकीच्या प्रवृत्तीची लोकं आपल्या आजुबाजूला राहता कामा नये, याची काळजी घ्या. यापुढे पोलिसांच्या कारवाईत राजकीय हस्तक्षेप चालणार नाही. मी कोणावरही अन्याय होऊ देणार नाही. हे नव्याचे नऊ दिवस समजू नका, असे अजित पवार यांनी सांगितले.

## शिधापत्रिकाधारकांनी १५ एप्रिलपर्यंत ई केवायसी करावी

**सातारा,दि.२९(प्रतिनिधी)**
राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम-२०१३ अंतर्गत अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य गट योजनेमध्ये अन्नधान्याचा लाभ घेत असलेल्या लाभार्थींचे शिधापत्रिकेत संलग्न असलेले आधार क्रमांक बरोबर असल्याचे, शिधापत्रिकेत नमूद व्यक्ति त्याच आहेत याची खात्री करुन रास्तभाव दुकानातून १५ एप्रिल पर्यंत ई केवायसी करुन घ्यावी, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

सर्व तालुका कार्यालयांना रास्तभाव दुकान स्तरावर कॅम्प आयोजित करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत, तरी ज्या लाभार्थींनी अद्यापही ई केवायसी केलेली नाही, त्यांनी स्वताचे आधार कार्ड व शिधापत्रिका घेऊन जवळच्या रास्तभाव दुकानात जाऊन ई केवायसी करुन घ्यावी, असे न केल्यास भविष्यात शिधापत्रिकेवरील धान्य बंद होण्याची शक्यता आहे.

## जयवंत शुगर्सचा वजनकाटा अचूक



**धावरवाडी : जयवंत शुगर्सच्या वजनकाट्याची तपासणी करताना शासकीय अधिकारी व शेतकरी संघटनेचे पदाधिकारी.**

**कर्मयोगी वृत्तसेवा**
**कराड,दि.३०**
धावरवाडी (ता. कराड) येथील जयवंत शुगर्स कारखान्याच्या वजनकाट्याची जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार शासकीय भरारी पथकाने अचानक भेट देऊन तपासणी केली. त्यावेळी भरारी पथकाच्या सदस्यांनी विविध निकषांच्या आधारे वारंवार केलेल्या वजनावेळी, प्रत्येकवेळी जयवंत शुगर्सचा वजनकाटा अचूक असल्याचे सिद्ध झाले.

सातारा जिल्ह्यातील विविध साखर कारखान्यांच्या वजनकाट्यांची तपासणी करण्याबाबत जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी आदेश काढले आहेत. यानुसार निरीक्षण अधिकारी श्रीमती साहिला नायकवडे, कराडचे वजनमापे निरीक्षक योगेश अग्रवाल, विशेष लेखा परीक्षक एस. पी. शिंदे आणि एस. आर. सानप, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उत्तम साळुंखे, शरद जोशी शेतकरी संघटनेचे तात्यासो पाटील, बळीराजा शेतकरी संघटनेचे सुनिल कोळी, बळीराजा शेतकरी संघटनेचे दिपक पाटील, रयत क्रांती शेतकरी संघटनेचे अशोक लोहार, रयत क्रांती शेतकरी संघटनेचे विशाल पुस्तके यांनी संयुक्तपणे जयवंत शुगर्स कारखान्याला अचानक भेट देऊन कारखान्याच्या ऊस वजनकाट्याची तपासणी केली.

ऊसाने भरलेल्या गाड्यांचे प्रत्यक्ष वजन करून, गव्हाणीकडे गेलेल्या गाड्या फेरवजन करण्यासाठी परत इलेक्ट्रॉनिक वे ब्रीजवर बोलवण्यात आल्या. या चाचणीवेळी अचूक वजन नोंदविण्यात येत असल्याचे या समितीला दिसून आले. तसेच वजनकाट्याबाहेर लावलेल्या डिस्प्लेवर भरलेल्या गाड्यांचे व रिकाम्या गाड्यांचे वजनही अचूकपणे होत असल्याचे दिसून आल्याने जयवंत शुगर्सचा वजनकाटा अचूक असल्याचा शेरा पथकाने दिला.

यावेळी कारखान्याचे इन्स्ट्रुमेंट मॅनेजर अरुण खटके, केन मॅनेजर नाथा कदम, सुरक्षा अधिकारी विठ्ठल भोसले, केन यार्ड सुपरवायझर सतीश सोमदे, रविराज बनसोडे आदी उपस्थित होते.